दैनिक युवाराष्ट्र दर्शन

# यवतमाळ

३

गुरुवार, १२ फेब्रुवारी २०२६

जिल्हा

## महाजन कॉलेज ऑफ टेक्नॉलॉजी द्वारा पशु चिकित्सा शिबिर आयोजित



युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी यवतमाळ

यवतमाळ येथील महाजन कॉलेज ऑफ टेक्नॉलॉजी द्वारा शहरालगतच्या जांब या गावी आयोजित रा.से.यो शिबिरामध्ये मोफत पशु चिकित्सा शिबिर आयोजित करण्यात आले.या शिबिराला गावकऱ्यांचा चांगला प्रतिसाद लाभला.यामध्ये जनावरांची तपासणी व मोफत उपचार करण्यात आले. यासाठी राज्य पशुसंवर्धन विभाग कडून डॉ.बनसोड , डॉ. मुत्तेलवार व सहकारी यांनी तपासणी केली. या वेळी कॉलेज चे प्राचार्य आशिष होरे , रासेयो अधिकारी प्रा.नरेंद्र पंडित, डॉ स्वाती सरकटे, प्रा पल्लवी वरकड , प्रा.अंजली पाटील , प्रा.सोनल शेलारे, अधीक्षक गजानन सामृतवार , रवी कोहचाडे व स्वयंसेवक विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते

**मैं**

हर बात का जवाब देना
अब मैंने छोड़ दिया,
खामोशी ही मेरा वजूद है
ये मैंने मान लिया।
जो हर बात का हिसाब माँगे,
उसे पीछे छोड़ दिया,
तभी तो मेरी चुप्पी मेरी
असली पहचान बन गई।
फ़ौरन जवाब देना
अब मेरी आदत नहीं,
समझा सोच-समझकर खेले,
बाज़ी उसी की सही।
अब मैं हर चाल पर अपना
मोहरा नहीं चलाता,
ख़ामोश रहकर भी खेल
पलट देना मुझे आता है।
मैं अपनी सफ़ाई अब
हर किसी को नहीं देता,
जो समझदार है,
उसे तो इशारा ही काफ़ी होता।

सबको ख़ुश रखने का
हुनर भी छोड़ आया,
'ना' कहना सीखा,
तभी तो मैं ख़ुद को समझ
पाया।

मै हर राज़ अब
जुबान तक आने नहीं देता,
क्योंकि हर मुस्कान के पीछे
कोई मतलब होता।

मेरी ख़ामोशी को मेरी
कमज़ोरी मत समझना,
कुछ हथियार ऐसें है,
जो वक्त आने पर ही चलते है।

**- शब्द रचना**
**पराग पिंगले**
**यवतमाळ**

## संक्षिप्त

### गटई स्टॉल योजनेंतर्गत कामगारांना 100 टक्के अनुदानावर स्टॉल !

यवतमाळ : सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत अनुसूचित जातीतील चर्मकार समाजासाठी राबविण्यात येणाऱ्या 'गटई स्टॉल योजना'अंतर्गत सन 2025-26 या वर्षासाठी अर्ज मागविण्यात आले आहेत. चर्मकार, ढोर, होलार, मोची आदी समाजघटकांचे आर्थिक, शैक्षणिक व सामाजिक जीवनमान उंचावून त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याच्या उद्देशाने ही योजना सन 1997 पासून सुरू आहे. या योजनेअंतर्गत महानगरपालिका, नगरपालिका, छावणी क्षेत्र व ग्रामपंचायत क्षेत्रात पात्र गटई कामगारांना 100 टक्के शासकीय अनुदानावर लोखंडी पत्र्याचे स्टॉल तसेच ५ हजार इतके रोख अनुदान देण्यात येणार आहे.

# भोंगळ कारभारास 'सीओ' जबाबदार

## पालिकेच्या कारभारावर ताशेरे; काँग्रेस गटनेत्या वैशाली सवाई यांचा पत्रपरिषदेत आरोप



**•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, यवतमाळ, दि. ११ फेब्रुवारी**

गटनेता निवडूण आल्यापासून १० ते १५ पत्राचे अजुनपर्यंत उत्तर दिले नाही, सुचविलेल्या कामांचे अगोदरच टेंडर निघून कंत्राटदाराच्या घशात हा सर्व प्रकार बघता नगर परिषदेच्या भोंगळ कारभारास मुख्याधिकारी जबाबदार असल्याचा आरोप काँग्रेसच्या गटनेत्या वैशाली सवाई यांनी विश्रामगृहात घेतलेल्या पत्रकार परिषदेतून केला.

२६ जानेवारीच्या कार्यक्रमात साध्या नगरसेवकांना बसण्यासाठी खुर्च्याही नव्हत्या, फेटे बांधणीमध्ये सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये दुजाभाव निर्माण केला होता. भाजपाची सत्ता असल्यामुळे हम करे सो कायदा अशा प्रकारचा कारभार सद्यपरिस्थितीत नगर परिषदेमध्ये सुरू आहे. बायो मायनिंगचे टेंडर सभागृहात ठेऊ असे म्हटले होते मात्र ते अगोदरच त्याचा निकाल लावला होता. अध्यक्ष म्हणतात मला सगळ्यांना घेऊन चालायचे आहे मात्र एखादा प्रश्न विचारायला गेल्यास उत्तर न देता समोरचा प्रश्न घ्या असे म्हणतात. त्यामुळे अध्यक्षांनी सभागृहात गांभीर्याने लक्ष देऊन कामकाज सांभाळावे, शंभर दिवसाचा कृती आराखडा सभागृहात न ठेवता मंजूर करुन घेतला. यवतमाळवासीयांना शहर स्वच्छ व सुंदर कसे होईल हा मुद्दा पाहिजेत मात्र यापासून सद्यपरिस्थितीत नगर परिषद कोसो दूर आहे. जनतेला आवश्यक असलेल्या बाबी कुठेच दिसत नाही. जसे की कुत्रे, डुकरे, मोकाट जनावरे यांचा तर संपूर्ण शहरात सुळसुळाट सुटला आहे. रस्त्याची दयनीय अवस्था झाली आहे. सावरगड येथे कुत्र्यांचा बंदोबस्त करण्यासाठी म्हणून कोंडवाडा निर्माण केला आहे. मात्र या कोंडवाड्यात एकच कुत्र आढळुन आले आहे. लाखो रुपयांचे सागवान फर्निचर परस्पर कुणालाही न विचारता विकुण टाकले. सभागृहात घरकुल, कचरा याविषयी प्रश्न विचारला असता नगराध्यक्ष काहीच बोलत नाही. नमो उद्यानसाठी एक कोटी रुपये मंजूर झाले आहे. मात्र हे नमो उद्यान शहराच्या बाहेर होत असल्याने नागरिकांची गैरसोय होणार त्यामुळे हे नमो उद्यान शहराच्या मध्यभागी व्हावे अन्यथा आंदोलन छेडण्याचा ईशारा देशमुख यांनी यावेळी दिला. दहा सुरक्षारक्षकांची नेमणूक करण्याचा निर्णय मुख्याधिकारी यांनी घेतला आहे. आणि यावर वेतन जबरदस्त देणार असल्याने ही निवड जनतेच्या पैशाची उधळपट्टी होणार नाही का? असा प्रश्न यावेळी सवाई यांनी केला. विशेष म्हणजे विकासकामे कागदावरच दाखवून लाखो रुपयांचा निधी हडपण्याचा प्रकार सुरू आहे.

अल्पसंख्याक दलित वस्तीचा निधी वापस जातो यावरुनच स्पष्ट होते की, नगर परिषदेने या दोन्ही योजना वा-यावर सोडल्या आहे की काय? असा प्रश्न उपस्थित केला. पत्रकार परिषदेला काँग्रेस शहर अध्यक्ष प्रा. बबलू उर्फ अनिल देशमुख, अमृता तिवारी, साधना शंभरकर, तबस्सुम मनवर शहा, वनिता बडे, शाईन परविन मोहम्मद नईम, तनवीर शहा, प्रमोद बगाडे, विलास पावडे आदी उपस्थित होते.

## दोन दुचाकी लंपास

**•युवाराष्ट्र दर्शन यवतमाळ :**

जिल्ह्यात वाहन चोरीच्या घटनांमध्ये वाढ झाली असून उमरखेड आणि वणी येथे दोन मोटारसायकली चोरीला गेल्या आहेत. उमरखेड तालुक्यातील धानोरा येथील फिर्यादी बालाजी परमेश्वर काळे यांची २५,००० रुपये किमतीची दुचाकी अज्ञात चोरट्याने पळवून नेली.

तसेच, वणी येथील जिल्हा परिषद कॉलनी परिसरातून अविनाश तात्याजी पानघाटे यांची २०,००० रुपये किमतीची पांढऱ्या पट्ट्याची 'एफएफ डिलक्स' मोटारसायकल अज्ञात आरोपीने चोरली आहे. दोन्ही घटनांबाबत संबंधित पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२) नुसार गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

# अवैध रेतीसह ट्रक जप्त

**•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, मारेगाव, दि. ११ फेब्रुवारी**

पोलीस स्टेशनच्या हद्दीत अवैध रेती वाहतुकीवर मोठी कारवाई करण्यात आली आहे. कुंभा ते करणवाडी रोडवर साखरा गावाजवळ पोलिसांनी सापळा रचून ट्रक अडवला.

या ट्रकमध्ये विनापरवाना अवैध रित्या ४ ब्रास रेतीची वाहतूक केली जात असल्याचे आढळून आले. पोलिसांनी २०,००० रुपयांची रेती आणि ६ लाख रुपयांचे वाहन असा एकूण ६,२०,००० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणी आरोपी ज्ञानेश्वर गणपतराव ठाकरे आणि सचिन दरणे यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता आणि महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियमांतर्गत गुन्हा नोंदवण्यात आला आहे

# आर्णी नाका मृत्यूचा सापळा बनतोय का?

## प्रशासनाच्या निष्क्रियतेमुळे नागरिकांचे जीव धोक्यात!



**•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, यवतमाळ, दि. ११ फेब्रुवारी**

आज सकाळी 7.30 वाजता आर्णी नाका परिसरात भरधाव वेगातील स्कॉर्पिओ वाहनाने दुचाकीला चिरडले. या भीषण अपघातात दुचाकी चालक गंभीर जखमी झाले आहेत. हा अपघात अपवाद नसून, अवघ्या दोन दिवसांपूर्वी याच ठिकाणी असाच अपघात झाला होता, हे विशेष! प्रश्न असा आहे की — अपघातानंतरच प्रशासन जागं होणार आहे का? कोणाचा मृत्यू झाल्यावरच उपाययोजना केल्या जाणार आहेत का?

आर्णी नाका हा परिसर दिवसरात्र प्रचंड वर्दळीचा आहे. दुचाकी, चारचाकी, ट्रॅव्हल्स, खासगी व शासकीय वाहने भरधाव वेगात धावत असतात, पण स्पीड ब्रेकर नाही, ट्रॅफिक सिग्नल नाही, वाहतूक नियंत्रणाचा पत्ताच नाही. वारंवार अपघात होत असताना सुद्धा प्रशासनाचे कानावर हात ठेवून बसणे म्हणजे नागरिकांच्या जीवाशी खेळ नाही का? असा संतप्त सवाल आता नागरिकांकडून उपस्थित केल्या जात आहे.

स्थानिक नागरिकांनी याआधीही अनेकदा तोंडी व लेखी तक्रारी करूनही प्रशासनाने बघ्याची भूमिका घेतली आहे. यामुळे आर्णी नाका परिसर अपघातांचा हॉटस्पॉट बनत चालला आहे. तरी तात्काळ — स्पीड ब्रेकर बसवावेत, ट्रॅफिक सिग्नल कार्यान्वित करावा, वाहतूक पोलिसांची कायमस्वरूपी नेमणूक करावी, अन्यथा रस्त्यावर उतरण्याचा इशारा स्थानिक नागरिकांनी दिला आहे.

वेळीच ठोस उपाययोजना न झाल्यास, भविष्यात होणाऱ्या सर्व अपघातांची व जीवितहानीची जबाबदारी संपूर्णपणे प्रशासनावर राहील, असे स्पष्ट शब्दांत नागरिकांनी सांगितले आहे.

# कचरा कुंडीचे महिलांना वाटप

## हळदी कुंकू प्रोग्राम मधुन प्लास्टिक मुक्त गावासाठी ग्रामपंचायतचा पुढाकार




**•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, आर्णी, दि. ११ फेब्रुवारी**

परसोडा ग्रामपंचायत द्वारे प्रत्येक कुटुंबातील महिलांना प्लास्टिक निर्मूलन व कचरा व्यवस्थापण करणे संदर्भात हळदी कुंकवाचे औचित्य साधून कचरा कुंडीचे वाटप सरपंच सौ. स्वप्ना अतुल पाटील देशमुख यांचे उपस्थितीमध्ये करण्यात आले. मुख्यमंत्री पंचायत राज अभियान अंतर्गत परसोडा ग्रामपंचायत द्वारे महिलांना प्लास्टिक निर्मूलन व कचरा व्यवस्थापन करणे संदर्भात हळदी कुंकवाचे औचित्य साधून गावातील प्रत्येक कुटुंबातील स्त्रियांना ग्रामपंचायत मध्ये कचरा कुंडीचे वाटप करण्यात आले ह्यातून प्लास्टिक मुक्त गावाचा सामाजिक संदेश देऊन गावातून प्लास्टिक हद्द पार करण्याचा उद्देश आहे. ह्यावेळी सरपंच प्रा. स्वप्ना अतुल पाटील देशमुख, उपसरपंच सुनंदा पत्रे, मंगला चौधरी, अर्चना राठोड ग्रामपंचायत सदस्य, रोशनी ग्रामसंघ अध्यक्ष स्वाती पत्रे, पशु सखी आशा सोळंके, प्रभात संघ प्रमुख संध्या देशमुख, मंदा कोल्हे, जनिता गुडे, मंजुषा मिसाळ, राजश्री कोल्हे, सारिका कोल्हे, नलू पारधी, इंदिरा सोळंके, कमला जुडे, गहुकर्णा कुडवे, अनुसया पत्रे,रेखा गुडे, वनिता शेळके, वनिता डहाणे,सुनिता देशमुख, लक्ष्मी सोळंके, सुनिता सोळंके, बेबीबाई राठोड,पायल पवार, कल्पना जाधव, सविता जाधव, पुष्पा जाधव, चंदा जाधव यांनी सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विशेष मेहनत घेतली.

## नावात बदल

माझे लग्नापूर्वीचे जुने नाव : SAKEENA BANOO MOHAMMED RIYAZ हे होते. आता त्यात बदल करुन माझे लग्नानंतरचे नविन नाव : SAKEENA BANU MOHAMMED SALEEM KHAKHU हे आहे. या दोन्ही नावाची व्यक्ती एकच असुन या पुढील व्यवहारात मला माझ्या नविन नावानेच ओळखावे.

SAKEENA BANU MOHAMMED SALEEM KHAKHU
ADDRESS : ISLAMPURA YAVATMAL 445001 MAHARASHTRA

# मुख्यमंत्र्यांकडून जिल्हा वार्षिक योजनेचा आढावा

**•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, यवतमाळ, दि. ११ फेब्रुवारी**

पुढच्या आर्थिक वर्षासाठीच्या जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) च्या प्रारूप आराखड्यासंदर्भात मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी मुंबईतील सह्याद्री अतिथीगृह येथून दूरदृष्य प्रणालीद्वारे बैठक घेवून आढावा घेतला.

या बैठकीला सह्याद्री अतिथीगृह येथे पालकमंत्री ना. संजय राठोड व जिल्हाधिकारी कार्यालयातील महसूल भवन येथे आमदार किसन वानखेडे, जिल्हाधिकारी विकास मीना, मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार पत्की, प्रकल्प संचालक अमित रंजन, जिल्हा नियोतजन अधिकारी सुधाकर आडे व विविध विभागांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

या बैठकीत पालकमंत्री ना. संजय राठोड यांनी जिल्हा वार्षिक योजनेसह पूर संरक्षण भिंत बांधकाम अधिकार, आरोग्य सुविधेसाठी अत्याधुनिक उपकरण खरेदी, पंचायत समिती इमारत बांधकाम, पोलीस स्थानक आणि नाविण्यपूर्ण कामांसाठी निधी आवश्यक असल्याचे त्यांनी या बैठकीत सांगितले. तसेच जिल्हाधिकारी यांनी जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) मध्ये तरतूद करण्यात आलेल्या कामांची माहिती देवून निधी मंजुरीची मागणी केली.

# उपजिल्हा रुग्णालय पुसद येथे जागतिक युनानी दिवस संपन्न

## जागतीक कर्करोग दिवसानिमीत्त मार्गदर्शन शिबीराचे आयोजन




**•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी पुसद, दि. ११ फेब्रुवारी**

महान हकिम, विद्वान, स्वातंत्रसैनिक हकीम अजमल खान यांच्या जयंती निमीत्त आज दिनांक ११ फेब्रुवारी २०२६ रोजी जागतिक युनानी दिवस उपजिल्हा रुग्णालय पुसद येथे साजरा करण्यात आला या कार्याक्रमाचे अध्यक्षस्थानी रुग्णालयाच्या अधिक्षका डॉ. एम. एम. भेलोंडे होत्या.

आयुष मंत्रालय भारत सरकार द्वारे दरवर्षी ११ फेब्रुवारीला जागतीक युनानी दिवसानिमीत्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येतात. यावर्षाच्या युनानी दिवसाची संकल्पना " युनानी प्रक्टीसमध्ये नवीनता व पुरावा (INNOVATION AND EVEDENCE IN UNANI PRACTICE) ही होती. या संकल्पनेवर डॉ. सय्यद इमरान आयुष वैद्यकिय अधिकारी यांनी आपले विचार व्यक्त केले त्यांनी त्यांच्या मार्गदर्शनात आजच्या या धावपळीच्या युगात असंसर्गीत आजार जसे शुगर, ब्लड प्रेशर, कर्करोग, इत्यादी आजार झपाट्याने वाढत आहेत. भारतीय चिकित्सा पध्दतीच्या साहाय्याने आपण आपली जीवन शैली बदलुन या आजारापासुन मुक्त राहु शकतो. केंद्रीय युनानी चिकित्सा अनुसंधान परिषद ही संस्था युनानी चिकित्सा पदधतीवर नवीन शोध करून विविध आजारावर युनानी चिकित्सा औषधोपचार करुन असंसर्ग आजारावर नियंत्रण करण्यात भरीव प्रयत्न करत आहेत व यात यश पण प्राप्त झाले आहे. सद्यस्थितीत जगाच्या एकुण शुगर रुग्णांपैकी भारतात सर्वाधिक रुग्ण आढळुन येतात ही एक मोठी आरोग्याची समस्या आहे त्यावर युनानी औषधोपचार येणाऱ्या काळात प्रभावी ठरेल असे प्रतिपादन डॉ. सय्यद इमरान यांनी केले.

जागतीक कर्करोग दिनानिमीत्त उपजिल्हा रुग्णालय पुसद येथे मार्गदर्शन शिबीराचे आयोजन करण्यात आले. अध्यक्ष म्हणुन डॉ. एम. एम. भेलोंडे व प्रमुख पाहुणे पुसद गॅयनिक ऑब्सटाटरीक्स सोसायटी च्या अध्यक्षा डॉ. सुहासीनी भोपी होत्या. त्यांनी स्त्री प्रसुती विषयी व स्त्रीयांच्या कर्करोगाविषयी मार्गदर्शन केले. तसेच कार्यक्रमाचे अध्यक्षा डॉ. एम. एम. भेलोंडे यांनी सुध्दा आपले अध्यक्षीय मनोगतात कर्करोगाचे विविध लक्षणे प्रतिपादन करुन त्यांचा शासकिय योजनाचा कसा लाभ नागरिकांना घेता येईल याबद्दल मार्गदर्शन केले. या कार्यक्रमात उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकिय अधिकारी डॉ. रोहीणी लोणकर, डॉ. आशिष कदम, डॉ. पुर्वी धरमशी, तसेच रुग्णालयाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते व सर्वांचे मोठे सहयोग लाभले.

महाराष्ट्र शासन

**तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी झरीजामणी यांचे कार्यालय, ता. झरीजामणी**

क्रमांक/अका/ प्रस्तु 2/कावी/306/2025 दिनांक 31 डिसेंबर 2025

प्रस्तुत प्रकरणात ग्राम पंचायत अधिकारी अहेर अल्ली यांनी आवेदक प्रभाकर रामचंद्र राऊत रा. अहेर अल्ली ता. झरीजामणी यांची मुलगी कु. **वैशाली प्रभाकर राऊत** यांची जन्म दि. 09/10/1976 रोजी मौजा अहेर अल्ली येथे झाला असून त्यांची जन्माची नोंद त्यावेळी ग्रामपंचायतला माहिती अभावी केली नसल्याने जन्म/मृत्यु नोंदणी अभिलेखामध्ये नोंद उपलब्ध नाही. सबब सदर तारखेची जन्माची नोंद ग्राम पंचायत अहेरअल्ली येथील जन्म/मृत्युः नोंदणी अभिलेखामध्ये घेण्याचा आदेश पारीत करावा. याबाबतचा प्रस्ताव या कार्यालयास सादर केला आहे.

करिता सर्व नागरीकांना याद्वारे कळविण्यात येते की, सदर अर्जानुसार उपरोक्त व्यक्ती यांचे जन्माची नोंद ग्रामपंचायत अहेर अल्ली येथील जन्म-मृत्यु नोंदणी अभिलेखामध्ये घेण्याबाबत ज्या कोणासही काही सांगावयाचे असल्यास अथवा काही आक्षेप घ्यावयाचा असल्यास त्यांनी सदरचा जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन 15 दिवसाचे आत या न्यायालयात हजर राहुन आपण किंवा आपल्या वकीलामार्फत सर्व पुरावे तसेच उपलब्ध असलेल्या दस्तऐवजासह आपले आक्षेप दाखल करावे.याद्वारे पुढे असेही जाहीर करण्यात येते की, वर नमुद केल्याप्रमाणे विहीत मुदतीत कोणतेही आक्षेप प्राप्त न झाल्यास कोणाला काहीही सांगावयाचे नाही असे गृहीत धरुन सदर अर्जावर सुनावणी करण्यात येवुन आदेश पारीत करण्यात येईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

**अक्षय रासने**
**तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी**
**झरीजामणी**

# यवतमाळात जैन बिझनेस कार्निवल 2026 यशस्वीरीत्या संपन्न



**•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी यवतमाळ, दि. ११ फेब्रुवारी**

उद्योजकता, नवकल्पना आणि व्यापाराच्या नव्या संधींचा संगम साधणारे भव्य जैन बिझनेस कार्निवल – 2026 यवतमाळ शहरात मोठ्या उत्साहात आणि यशस्वीरीत्या पार पडले. जोश फाउंडेशन, यवतमाळ यांच्या वतीने समता मैदान, यवतमाळ येथे 6 ते 9 फेब्रुवारी 2026 या कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या या चार दिवसीय कार्निवलला उद्योजक, व्यापारी, विद्यार्थी व नागरिकांचा भरभरून प्रतिसाद मिळाला. या कार्निवलमध्ये विविध उद्योग क्षेत्रांतील आकर्षक स्टॉल्स, उत्पादन व सेवांचे सादरीकरण, नेटवर्किंग सत्रे, तज्ज्ञांचे मार्गदर्शन, लघु व मध्यम उद्योगांना प्रोत्साहन तसेच स्थानिक व्यवसायांना व्यापक बाजारपेठ उपलब्ध करून देण्याचा प्रभावी प्रयत्न करण्यात आला. नवोदित उद्योजकांना व्यवसायाच्या संधी, मार्गदर्शन व संपर्क मिळण्यासाठी हे व्यासपीठ अत्यंत उपयुक्त ठरले. व्यवसायासोबतच मनोरंजनालाही विशेष महत्त्व देण्यात आले होते. लाईव्ह ऑर्केस्ट्रा, लहान मुलांसाठी खेळणी तसेच विविध खाद्यपदार्थांचे स्टॉल्स ही कार्निवलची प्रमुख आकर्षणे ठरली. त्यामुळे कुटुंबासह आलेल्या नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर उपस्थिती नोंदवली. समारोप सोहळा उत्साहात कार्निवलचा समारोप सोहळा 9 फेब्रुवारी रोजी रात्री 8 वाजता पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी आमदार कीर्ती बाबू गांधी होते. यावेळी जैन सेवा समितीचे अध्यक्ष महावीर भंसाली, यवतमाळ जिल्हा बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. संजय जैन, महावीर फाउंडेशनचे अध्यक्ष विजयकुमार बुंदेला, गुजराती समाजाचे अध्यक्ष चेतनभाई पारेख, श्वेतांबर मूर्तीपूजक श्री संघाचे लहरभाई नागडा, महाराष्ट्र प्रदेश मानव अधिकार संघटनेचे राज्य अध्यक्ष इरफान मलनस, जैन कार्निवल 2026 चे प्रकल्प अधिकारी प्रज्योत कांकरिया, जोश फाउंडेशनच्या उपाध्यक्ष सीमा तातेड, सौ. चंदा कोटेचा, युवा समितीचे अध्यक्ष श्याम भंसाली आदी मान्यवर प्रामुख्याने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रज्योत कांकरिया यांनी केले. सूत्रसंचालन सौ. आरती खिवसरा यांनी केले, तर आभार प्रदर्शन सम्यक सुराणा व उमेश बैद यांनी केले. . कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शुभम खिवसरा, प्रजोत कांकरिया ईशान बोथरा, उमेश बैद. राजेश गूगलीया, हर्ष बोरा, जयेश बोरा, वृषभ बोरा, मोहित सुराणा, अर्पित बोरा, गौरव गुगलीया, सम्यक सुरणा, सुनय ओसवाल, दीपेश बोरा, नवीन कोठारी, हर्ष भरुट, पराग बंब, राहुल बोरा, पियुष झांबड, सुयश बोरा, मंगलेश गादिया, जिनेश कर्णावट , चिराग पिपरिया, ओजस बरलोटा, वर्षा तातेड, वंदना बोरुंदिया, आरती खिवसरा, मीनल बोरा, योगिता बरलोटा, रानू झांबड, भार्गवी दर्डा, ममता बोरा, योगिता बरलोटा, साक्षी खिवसरा,समीक्षा अलिझार, हर्षिता कुचेरिया, पलक झांबड, खुशी कोठारी, सह जोश फाऊंडेशनचे असंख्य पदाधिकारी प्रयत्नशील होते

क्रमांक/म/सहा.प्रस्तु-3/कावि/120/2026
तहसिलदार उमरखेड यांचे कार्यालय, उमरखेड
दिनांक:- 09/02/2026

## जाहीरनामा

सर्व नागरिकांना याद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार **शेख हैदर शेख यासीन रा. विडुळ**.ता. उमरखेड जि. यवतमाळ यांनी अर्ज सादर केला की, त्यांचा स्वताचा जन्म दि **03/03/1974** रोजी मौजा **विडुळ** येथे झाला आहे. अर्जासोबत जन्म अनुउपलब्धता उपलब्ध नसल्याबाबत प्रमाणपत्र व अर्ज या कार्यालयास सादर केलेला आहे. उपरोक्त प्रकरणी अर्जदार यांना **जन्म नोंद** आदेश देणे बाबतचे प्रकरणात कोणाचे आक्षेप/हरकती घ्यावयाचा असेल तर त्यांनी दिनांक 26.02.2026 पर्यंत लेखी स्वरुपात या कार्यालयात कार्यालयीन दिवशी व कार्यालयीन वेळेत सादर करावयात. दिलेल्या मुदतीनंतर आलेल्या आक्षेप/हरकती अर्जाचा विचार केल्या जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

**स्वा/-**
**तालुका दंडाधिकारी**
**उमरखेड**

युवाराष्ट्र दर्शन ⑦
# वर्धा जिल्हा
गुरुवार, १२ फेब्रुवारी २०२६

## ट्रॅक्टर पलटी होऊन चालकाचा मृत्यू

■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**हिंगणघाट, दि. ११**

शहराजवळील बुरकोनी चौरस्ता येथे शनिवारी सकाळी ९ वाजता अवैध रेती वाहतूकीदरम्यान ट्रॅक्टर पलटी होऊन झालेल्या भीषण अपघातात ट्रॅक्टर चालक अक्षय सुरेश आंबाडे (रा. धामणगाव) यांचा मृत्यू झाला, हा अपघात सकाळच्या वेळेत, दिवसाढवळ्या घडल्याने हिंगणघाट परिसरात रेती वाहतूक खुलेआम सुरु असल्याचे पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे, पोलिस व महसूल प्रशासनाच्या नाकावर टिच्चून हा बेकायदेशीर व्यवसाय सुरु असल्याने संबंधित यंत्रणांच्या भूमिकेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे, दिवसाढवळ्या रेतीची वाहतूक म्हणजे महसूल गौण खनिजांची थेट चोरी असल्याचे स्पष्ट झाले असून या अवैध व्यवसायामागे कुणाचा वरदहस्त व आशीर्वाद आहे, असा सवाल उपस्थित होत आहे, अपघातानंतर एका ट्रॅक्टर मालकाकडून मिळालेल्या खात्रीशिर माहितीनुसार, हिंगणघाट परिसरातील रेतीघाटांचे लिलाव कोटयवधी रुपयात झालेले असतानाही अवैध उपसा थांबलेला नाही, या घाटांमधून दररोज अंदाजे दोनशे ट्रॅक्टरद्वारे कोटयवधी रुपयांची रेती उचलली जाते, असे समजते. या अपघातात अक्षय जागीच ठार झाला असून त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले व वडील असा परिवार आहे. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

## कृत्रिम बुद्धिमत्तेचा सकारात्मक वापर करावा - कुलगुरू डॉ. मनाली क्षिरसागर

■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**आर्वी, दि. ११**

कृत्रिम बुद्धिमत्ता चांगली की वाईट हा विषय आता चर्चेचा नाही, तर कृत्रिम बुद्धिमत्ता आपल्याला स्वीकारावी लागेल म्हणून कृत्रिम बुद्धिमत्तेचा सकारात्मक वापर करावा. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ.मनाली क्षिरसागर यांनी कला वाणिज्य विज्ञान महाविद्यालय आर्वी येथे ' कृत्रिम बुद्धिमत्ता (६) विविध पैलू, शिक्षण, अर्थशास्त्र आणि विज्ञान ' या विषयावर आयोजित राष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटनीय सत्रामध्ये उद्घाटक म्हणून त्या बोलत होत्या.




कृत्रिम बुद्धिमत्ताने माणूस तयार केला नाही तर माणसाने कृत्रिम बुद्धिमत्ता तयार केली आहे. शिक्षकांनी व संशोधक विद्यार्थ्यांनी त्याचा चांगला वापर आपल्या शिक्षणामध्ये करावा. ग्रामीण विद्यार्थ्यांना तंत्रस्नेही बनवण्याकरता कृत्रिम बुद्धिमत्तेवर परिषद आयोजित करून महाविद्यालयाने येणाऱ्या काळातील गरज ओळखली आहे ही निश्चितच प्रशासनीय बाब आहे.असे देखील त्यांनी सांगितले. या सत्राचे अध्यक्ष म्हणून कृषक शिक्षण संस्था, आर्वीचे अध्यक्ष ?ड.शोभाताई काळे तर प्रमुख अतिथी म्हणून कृषक शिक्षण संस्था आर्वीचे सचिव श्री.प्रदीपभाऊ काळे यांची उपस्थिती होती.सोबतच बीजभाषक म्हणून डॉ.अजय कुशवाह संगणकशास्त्र विभाग प्राध्यापक शारदा विद्यापीठ, ग्रेटर नोएडा यांची व श्री.पवन चांडक यांची उपस्थिती होती.विद्यापीठगीताने परिषदेची सुरुवात झाली. यावेळी व्यासपीठावर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,आर्वीचे प्राचार्य डॉ.रवींद्र सोनटक्के, नारायणराव काळे स्मृती मॉडेल कॉलेज कारंजा (घा) चे प्राचार्य डॉ.संजय धनवटे, आर्वी चे आयक्युएअसी समन्वयक डॉ.विजय खडसे, कारंजा (घा) चे आयक्युएअसी समन्वयक डॉ.उमेश मेश्राम, संयोजक डॉ.अमर सोटे यांची उपस्थिती होती. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून श्री.प्रदीपभाऊ काळे यांनी कृत्रिम बुद्धिमत्तेचे सकारात्मक व नकारात्मक दोन्ही पैलू मांडले. अध्यक्षीय भाषणामध्ये ॲड.शोभाताई काळे यांनी विविध क्षेत्रांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वापरासंबंधी चर्चा केली.

यानंतर झालेल्या पहिल्या तांत्रिक सत्रामध्ये डॉ.आशिष ससणकर प्राचार्य, इंद्रप्रस्थ न्यू आर्ट कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, वर्धा यांनी ' कृत्रिम बुद्धिमत्ता व शिक्षण ' या विषयावरआपले मत मांडले.या सत्राचे अध्यक्ष म्हणून डॉ.नितीन माथनकर प्राचार्य स्व.वसंतराव कोल्हटकर कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय रोहणा यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. यानंतरच्या दुसऱ्या तांत्रिक सत्रामध्ये डॉ.तुषार चौधरी यांनी ' कृत्रिम बुद्धिमत्ता व्यवस्थापन व सामाजिक शास्त्र ' या विषयावर सखोल मार्गदर्शन केले. या सत्राचे अध्यक्ष डॉ.देवेंद्र भोंगाडे प्राचार्य, अंतोदय महाविद्यालय देवग्राम यांची उपस्थिती होती. त्यासोबतच संशोधकांकरिता पेपर व पोस्टर सादरीकरण डॉ.मोरेश्वर देशमुख प्राचार्य, श्री समर्थ कला वाणिज्य महाविद्यालय आष्टी यांच्या अध्यक्षतेखाली सुरू होते. प्राचार्य डॉ.रवींद्र सोनटक्के यांच्या अध्यक्षतेखालील शेवटच्या अंतिम सत्रामध्ये प्रमुख पाहुणे म्हणून डॉ.मिलिंद पाटील माजी विभागप्रमुख सोबतच प्रमुख अतिथी डॉ.संजय धनवटे यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. यानंतर प्रमाणपत्र वितरित करून राष्ट्रगीताने या परिषदेची सांगता करण्यात आली.

या संपूर्ण परिषदेमध्ये संचालनाची जबाबदारी डॉ.मंजुषा भोयर, डॉ.अनुप गुंबळे, डॉ.नीरज केंढे, यांनी पार पाडली. पाहुण्यांचा परिचय डॉ.पवन ठाकरे, डॉ.रोहिणी मेश्राम, डॉ.अनिल दहाट यांनी करुन दिला. तर आभार प्रदर्शन डॉ.श्यामप्रकाश पांडे, प्रा.शैलेश खंदारे, डॉ.मनीषा खाकरे, डॉ.हेमराज चौधरी, डॉ.प्रवीण काळे यांनी केले. या राष्ट्रीयपरिषदे करता विविध महाविद्यालयातील प्राध्यापकांची उपस्थिती होती.परिषदेच्या यशस्वीतेकरता महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, प्राध्यापिका, शिक्षकेतर कर्मचारी व रासेयो स्वयंसेवकांनी मेहनत घेतली.

### भरधाव मिक्सर मशीनला अपघात ; चालक गंभीर जखमी

■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**आष्टी (श), दि. ११**

तालुक्यातील बोटोणा गावाजवळ कमळगीर महाराज देवस्थान परिसरात मध्यरात्री भरधाव वेगात धावणारी सिमेंट मिक्सर मशीन पलटी झाल्याची घटना घडली, या अपघातात चालक गंभीर जखमी झाला असून सुदैवाने मोठी जीवितहानी टळली.

माहितीनुसार, कारंजा (घा) तालुक्यातील नारा येथील सिमेंट मिक्सिंग प्लांटमधून सिमेंट व गिट्टीचे मटेरियल भरून एम. एच. १२ एक्सएम १७१३ क्रमांकाची मिक्सर मशीन आष्टी तालुक्यातील बोरखेडी येथे सुरु असलेल्या सिमेंट रस्त्याच्या कामासाठी जात होती, मध्यरात्रीच्या सुमारास बोटोणा गावाजवळ कळमगीर महाराज मंदिर परिसरात चालकाचा ताबा सुटल्याने मिक्सर मशीन पलटी झाली, या अपघातात मिक्सरचे मोठे नुकसान झाले. त्यात चालक गंभीर जखमी झाल्याचे समजते, घटना रात्री उशिरा घडल्याने रस्त्यावर वर्दळ नसल्याने मोठी दुर्घटना टळल्याचे ग्रामस्थांनी सांगितले, रात्री रस्त्याच्या कामासाठी धावणारी कंपनीची वाहने वेगात चालवला जातात व समोरुन येणाऱ्या वाहनांना साईड दिल्ली जात नसल्याने अपघाताची शक्यता वाढत असल्याची चर्चा परिसरात आहेत, तसेच काही चालक मद्यधुंद अवस्थेत वाहन चालवितात, अशीही माहिती स्थानिकांकडून दिली जात आहे.

## पर्यावरण व वन्यजीव संवर्धनासाठी स्थानिक नागरिकांचे सहकार्य आवश्यक : माधव आडे

### पांजरा बंगला येथे आयएसएमपा तर्फे पर्यावरण संवाद कार्यक्रम स्थानिक वनौषधींची माहिती जाणून घेतली




■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**वर्धा, दि. ११**

पर्यावरण आणि वन्यजीव संरक्षण व संवर्धनासाठी स्थानिक नागरिकांचे सहकार्य अत्यावश्यक आहे. मानव आणि वन्यजीव यांच्यात होणारा संघर्ष टाळण्यासाठी वन विभाग विशेष प्रयत्न करत असून त्यात नागरिकांची भूमिका महत्त्वपूर्ण आहे, असे मत सहायक वनसंरक्षक माधव आडे यांनी व्यक्त केले.

पांजरा बंगला येथे इंटेलेक्च्युअल सोसायटी ऑफ मीडिया प्रमोटर्स (आयएसएमपी) यांच्या वतीने ग्रामीण नागरिकांसोबत पर्यावरण जनजागृतीपर संवाद कार्यक्रमाचे आयोजन रविवार, ९ फेब्रुवारी रोजी करण्यात आले होते. यावेळी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. त्यांनी वनसंवर्धन, वनविकास आणि वन्यजीव संरक्षण याविषयी मार्गदर्शन केले तसेच महाराष्ट्र शासनाच्या विविध योजनांची माहिती दिली.

पांजरा बंगला येथील शाळेत आयोजित कार्यक्रमास वन्यजीव संरक्षक कौशल मिश्र, आयएसएमपीचे अध्यक्ष चंद्रशेखर आणि बी. एस. मिरगे हे मंचावर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या परिसराला 'अरण्यऋषी मारुती चितमपल्ली परिसर' नाव देण्यात आले होते. वक्त्यांनी पर्यावरण क्षेत्रातील त्यांच्या योगदानाचा गौरवपूर्वक उल्लेख केला.

या वेळी आयएसएमपीच्या वतीने सहायक वनसंरक्षक माधव आडे, कारंजा परिक्षेत्राचे क्षेत्राधिकारी नरेंद्र सावंत, वनरक्षक शिवाजी सावंत, वनरक्षक अश्विनी कोहपरे, राऊंड ऑफिसर प्रवीण डेहणकर, प्रताप ढाले, वनरक्षक सुनंदा उईके, वनरक्षक अक्षय जाधव, वनरक्षक अंचल रामटेके, पोलीस पाटील मुकेश चव्हाण आदींना सन्मानपत्र व प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले. यावेळी उपस्थितांनी स्थानिक ग्रामस्थांकडून वनौषधी व उपचाराविषयीची माहिती जाणून घेतली. कार्यक्रमाचे संचालन वनरक्षक शिवाजी सावंत यांनी केले.

यावेळी डॉ. ओ. पी. गुप्ता, एन. एन. काझी, प्रदीप श्रीवास्तव, राजेंद्र चौधरी, ए. एन. तहसीलदार, सुनील पांडेय, डॉ. अक्षय पारगावकर, डॉ. मंगेश भोयर, डॉ. अनिर्वाण घोष, डॉ. शाहिद अली, विजय देशपांडे, प्रदीप गावंडे, ॲड. ताम्रध्वज बोरकर, मीनाताई इंगळे, निलिमा मुणोत, प्रगती मिरगे, हेमलता सिंह, गीता मिश्रा, प्रिया माळी, आरती कुमारी, श्रेया जाधव, रवींद्र विठ्ठल राठोड (पांजरा बंगला), ओम साठे, माळेगावचे महादेवराव घागरे, राऊंड ऑफिसर रोहिणी पडोळे तसेच महात्मा गांधी आयुर्विज्ञान संस्थान, सालोड येथील विद्यार्थी आणि पांजरा बंगला येथील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## बॉईज स्पोर्टिंग क्लबच्या वतीने भव्य विदर्भस्तरीय क्रिकेट स्पर्धेचे आयोजन

■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**आर्वी, दि. ११**

स्व. अभिषेक अवथळे, स्व. दिपक भदाडे व स्व. मेहेर झेंडे स्मृतीप्रित्यर्थ बॉईज स्पोर्टिंग क्लबच्या वतीने भव्य टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेचे आयोजन दि. १५ फेब्रुवारी ते १९ फेब्रुवारी २०२६ ला स्थानिक तालुका क्रीडा संकुलच्या पटांगणावर करण्यात येत आहे.

मागील ३५ वर्षापासून बॉईज स्पोर्टिंग क्लबच्या वतीने टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे यावर्षी भव्य असे विदर्भस्तरीय क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात येत आहे. या स्पर्धेत प्रथम पुरस्कार ५१,०००/- रुपये रोख व ट्रॉफी आर.व्हि.परणकर कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी आर्वी, सुमित शिंगाणे, तुषार धाकुलकर टीन्केश महाजन तर्फे तर द्वितीय पुरस्कार ३१,०००/- रुपये रोख व ट्रॉफी प्रमोद गाठेव मित्र परिवार तर्फे देण्यात येणार आहे. स्पर्धेत अनेक वैयक्तिक पुरस्कार यात मॅन ऑफ द सिरीज ७,००० रुपये रोख व ट्रॉफी सुबोध ठाकरे यांचे तर्फे, मॅन ऑफ द मॅच (फायनल) ४००० रुपये रोख व ट्रॉफी विजय ढबाले यांचे तर्फे, बेस्ट बॅस्टमन ३,००० रुपये रोख व ट्रॉफी अजय मिरासे यांचे तर्फे, बेस्ट बॉलर ३,००० रुपये रोख व ट्रॉफी दशरथ धनकरे यांचे तर्फे, बेस्ट ऑलराऊंडर ३,००० रुपये रोख व ट्रॉफी आशिष क्षीरसागर यांचे तर्फे, प्रत्येक षटकाराला पुरस्कार विवेक धवड, किशोर शेकापुरे व योगेश बोंडे यांचे तर्फे, प्रत्येक मॅन ऑफ द मॅचला स्व. अभिषेक अवथळे स्मृतीप्रित्यर्थ साहेबराव अवथळे यांच्या तर्फे ट्रॉफी, बेस्ट टिम ऑफ द टूर्नमेंट (शिस्तबद्ध संघ) यांना ट्रॉफी स्व. प्रणव गायकवाड स्मुर्ती प्रीत्यर्थ किशोर गायकवाड यांचे तर्फे देण्यात येणार आहे. अश्याप्रकारे या स्पर्धेत बक्षिसांची लय लुट होणार आहे. तरी या स्पर्धेत संघांनी त्वरित सहभाग नोंदवावा असे आव्हान बॉईज स्पोर्टिंग क्लबचे आयोजक प्रा. डॉ. श्रीकांत ठाकूर, विजय झेंडे (जयस्वाल) व पवन ठाकूर यांनी केले आहे.

## चक्क खिशातून मोबाइल चोरला

**वर्धा, :** अज्ञात चोरटयाने तरुणाचा खिशातील मोबाइल चोरुन नेला,

ही घटना बसस्थानक परिसरात घडली, अक्षय अर्जुन मोहुर्ले (रा. नागपूर) हा फलाट क्रमांक १ वर नागपुरला जाण्यासाठी बसची वाट पाहत होता, बस लागली असता बसमध्ये चढला, मात्र, गर्दी असल्याने तो खाली उतरला आणि दुसरी बस केव्हा येणार, हे तपासत असताना त्याच्या खिशातील ३० हजार रुपये किमतीचा मोबाईल चोरून नेला.

## अज्ञात चोरटयाने केली दुचाकी लंपास

**वर्धा, :** मजुरीचे काम करुन उदरनिर्वाह करणारा व्यक्ती एटीएममध्ये रोख काढण्यासाठी गेला असता त्याची दुचाकी अज्ञात चोरटयाने चोरून नेली, ही घटना तक्रारीनंतर रविवारी उघडकीस आली, किशोर तुळशीराम वाघेला यांची एम. एच. ३२, ए. आर. ९०८८ क्रमांकाची दुचाकी अज्ञाताने चोरून नेल्याने त्यांचे ५० हजारांचे नुकसान झाले आहे, याप्रकरणी तक्रारीवरुन वर्धा शहर पोलिसांनी अज्ञात चोरटयाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

## श्री. संत गजानन महाराज मंदिर, येथे प्रकटदिन महोत्सव

■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**आर्वी, दि. ११**

श्री. संत गजानन महाराज मंदिर, गजानन नगर आर्वी येथे प्रकटदिन महोत्सव अतिशय भक्ती भावात व उत्साहात संपन्न झाला

शनिवार दि. ०७ फेब्रुवारी २०२६ श्रींची पालखी काढण्यात आली गजानन नगर एकविरा नगर, मुडे लेआउट चव्हाण लेआउट या कॉलनीतील नागरिकांनी रस्त्यावर रांगोळी व फुलाची सजावट करून पालखीचे स्वागत केले व पालखीचे पूजन करण्यात आले. पालखी



सोहळ्यामध्ये महिला भजन मंडळ तसेच गजानन नगर येथील नागरिकांनी सहभाग नोंदवला. लहान मुलांनी वेगवेगळी वेशभूषा करून पालखी परिक्रमे मध्ये आपला सहभाग घेतला. महिलांची संख्या मोठ्या प्रमाणावर होते रात्री ८.०० वा श्री सदाशिव महाराज मोरे साखरीकर, भुसावळ यांचे प्रवचन झाले.

रात्री नऊ वाजता श्री लहानूजी कला संच (उमेश चोरे व संच) यांचे भजन झाले.

रविवार दि ०८ फेब्रुवारी २०२६, सकाळी ७.०० वाजता मनीष तायडे व पायल तायडे यांनी श्रींचा अभिषेक व तिर्थ स्थापना केली. सकाळी ११ वा ह. भ. प. संदीप महाराज तायवाडे अमदोरी ता. चांदुर (रेल्वे) जि. अमरावती यांचे काल्याचे किर्तन झाले. नवनिर्वाचित बांधकाम सभापती संजय राऊत स्थायी समितीच्या सदस्य उषाताई सोनटक्के, मंदिराचे सेवेकरी डहाके, उत्कृष्ट रांगोळी काढल्याबद्दल यशस्वी दाणी व कल्याणी यादव यांचा सत्कार करण्यात आला.दुपारी १.०० ते रात्री ९.०० महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. मोठ्या संख्येने भक्तांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.

श्री संत गजानन महाराज प्रगट दिन महोत्सव यशस्वी करण्याकरता गजानन नगरवासी व समस्त भक्तगन यांनी परिश्रम घेतले.

## जुन्या वादातून काठीने मारले

**वर्धा :** जुन्या तरुणाला काठीने मारुन जखमी केले, ही घटना देरडा चौक हमदापूर गावात घडली, प्रफुल्ल दशरथ नखाते हा देरडा चौकात बसून असताना तेथे मधुकर सुरजुसे त्याने माझ्याशी मागे वाद का केला होता, असे म्हणत शिवीगाळ करुन काठीने डोक्यावर मारत जखमी केले, याप्रकरणी दहेगाव पोलिसात तक्रार दाखल करण्यात आली.

# उड्डाणपुलाचे काम की मृत्यूचा सापळा?

■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**तळेगाव (शा. पंत), दि. ११**

तळेगाव शा. पंत येथील टी-पॉईंटवर सुरू असलेले उड्डाणपुलाचे काम नागरिकांच्या जीवाशी खेळणारे ठरत असल्याचे पुन्हा एकदा उघड झाले आहे.उड्डाणपूलाचे काम नागरिकांसाठी मृत्यूचा सापळा ठरत आहे. अत्यंत संथ गतीने आणि कोणतेही नियोजन न करता सुरू असलेल्या या कामामुळे परिसरात अपघातांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे.

उड्डाणपुलाचे काम अर्धवट अवस्थेत असल्याने सध्या बाजूने वाहतूक सुरू आहे. मात्र रस्त्यावर जागोजागी खड्डे, गिट्टीचे ढीग तसेच सिमेंटचे कच्चे साहित्य (रॉ मटेरियल) तसेच पडून आहे. कोणतेही सूचना फलक, बॅरिकेड्स किंवा सुरक्षिततेची व्यवस्था नसल्यामुळे वाहनचालकांना मोठा धोका निर्माण झाला आहे.याच निष्काळजीपणाचा बळी आज एका निष्पाप तरुणाला द्यावा लागला.



### तळेगाव टी-पॉईंटवर तरुणाचा बळी तर एकाची प्रकृती गंभीर

आज सायंकाळी सुमारे ९ वाजताच्या सुमारास कुऱ्हा येथील रहिवासी राहुल जाधव (रा. कुऱ्हा)वय तीस वर्ष हा युवक आपल्या दुचाकी क्र. एम. एच. ४० बी. झेड.८५०७ ने दुधाळा (कोंढाळी) येथील एका कंपनीत कामासाठी जात असताना तळेगाव टी-पॉईंट परिसरात पोहोचला. अंधारात रस्त्यावर पडलेले गिट्टीचे मोठे ढीग आणि सिमेंटचे रॉ मटेरियल त्याच्या लक्षात न आल्याने त्याची दुचाकी त्यावर धडकली. जोरदार धडकेमुळे राहुल जाधव हा जागीच ठार झाला.याच ठिकाणी राहुलच्या मागून येणाऱ्या आर्वी येथील तीन जणांची दुचाकीही अपघातग्रस्त झाली. त्यापैकी एकाची प्रकृती गंभीर असून त्याला प्रथम आर्वी येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र प्रकृती अधिक चिंताजनक झाल्याने त्याला पुढील उपचारासाठी अमरावती येथे रेफर करण्यात आले असल्याचे समजते.

घटनेनंतर परिसरात एकच खळबळ उडाली. संतप्त नागरिकांनी उड्डाणपुलाच्या कामावर देखरेख करणाऱ्या संबंधित मॅनेजर व ठेकेदारांच्या निष्काळजीपणावर तीव्र संताप व्यक्त केला. 'कोणतेही नियोजन नाही, सुरक्षिततेची कोणतीही साधने नाहीत, आणि तरीही वाहतूक सुरू ठेवली जाते - याला जबाबदार कोण?' असा सवाल नागरिक उपस्थित करीत होते.या अपघातात विनाकारण एका तरुण, कर्त्या जवानाचा जीव गेला. कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.प्रशासनाने तात्काळ दखल घेऊन उड्डाणपुलाच्या कामाच्या ठिकाणी सुरक्षिततेच्या उपाययोजना कराव्यात, जबाबदारांवर कठोर कारवाई करावी आणि पुन्हा कोणाचाही बळी जाऊ नये, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.पोलिसांनी घटनास्थळी पोहचून जखमीस आर्वी येथील रुग्णालयात पाठविण्यात आले. पुढील तपास ठाणेदार मंगेश भोयर यांचे मार्गदर्शनात पी. एस. आय. किशोर खंडार पोलीस शिपाई सचिन ढाले हे करीत आहे.

### योग्य नियोजन, सूचना फलक, बॅरिकेड्स व सुरक्षिततेचा अभाव

विशेष म्हणजे, याच ठिकाणी पंधरा ते वीस दिवसांपूर्वीही एका अवघ्या बावीस वर्षीय तरुणाचा अपघातात मृत्यू झाला होता. त्या वेळीच प्रशासन, संबंधित ठेकेदार व उड्डाणपुलाच्या कामावर देखरेख करणाऱ्या अधिकाऱ्यांनी परिस्थितीची गांभीर्याने दखल घेतली असती, तर आजचा हा दुर्दैवी अपघात टाळता आला असता. योग्य नियोजन, सूचना फलक, बॅरिकेड्स व सुरक्षिततेची उपाययोजना वेळेत करण्यात आली असती, तर आज एका निष्पाप व्यक्तीचा जीव गेला नसता, हे मात्र तितकेच कटू आणि खरे वास्तव आहे.

## रेल्वे समस्यांबाबत खासदार काळे यांची केंद्रीय रेल्वेमंत्री वैष्णव यांचेशी चर्चा

■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**वर्धा, दि. ११**

लोकसभा मतदार संघात असलेल्या विविध समस्या संबंधाने खासदार अमर काळे यांनी आज १० फेब्रुवारीला केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांची भेट घेतली व मतदार संघातील विविध समस्यांबाबत पत्र लिहून त्यावर चर्चा केली.

वर्धा जिल्हयातील प्रामुख्याने नागपूर ते अमरावती दरम्यान रेल्वे विभागाद्वारे जे अंडरपास करण्यात आले त्यात वर्षभर पाणी साचून राहते.त्यामुळे या रस्त्यावरुन ये-जा करणाऱ्यांना मोठया त्रासाला सामोरे जावे लागते. त्यानंतर पुलगाव ते आर्वी या रस्त्यावर रेल्वे उड्डाणपुलाचे काम बऱ्याच वर्षापासून सुरु आहे. पूल मंजूर होऊन बरीच वर्षे होऊनही विभागाच्या अनास्थेमुळे हे काम रखडले आहे व याचा फटका पुलगाव–आर्वी या रस्त्यावरुन ये-जा करणाऱ्यांना सहन करावा लागतो. त्यामुळे खासदार अमर काळे यांनी उड्डान पुलाचे काम तात्काळ पुर्ण करावे किंवा रेल्वे फाटक तरी लोकांना ये-जा करण्याकरीता खुले करावे अशी मागणी केली.



कोरोना काळात नागपूर-बडनेरा तसेच वर्धा-हिंगणघाट या मार्गावर धावणाऱ्या बऱ्याच रेल्वे गाडयांचे थांबे रद्द करण्यात आले होते व काही गाडया सुध्दा रद्द करण्यात आल्या होत्या. यासोबतच पुलगाव ते आर्वी या नॅरोगेज मार्गावरील बंद पडलेली रेल्वेगाडी पूर्ववत सुरु करण्याच्या दृष्टीने आर्वी वासियांना रेल्वे सुविधा आर्वी पर्यंत उपलब्ध करण्याच्या दृष्टीने आर्वी – पुलगाव मार्गाचे ब्रॉडगेज मध्ये रुपांतरण करुन हा मार्ग पुढे वरुड पर्यंत वाढविण्याबाबतच्या विषयावर सुध्दा चर्चा केली. पुलगाव व वरुड ही रेल्वे लाईन झाल्याने पुलगाव व आमला हे दोन्ही दारुगोळा भांडार रेल्वे मार्गानी जोडल्या जाणार असून सध्याच्या प्रवासातील दिडशे कि.मी. अंतराचा प्रवास कमी होणार आहे. त्यामुळे ही लाईन लोकांच्या दृष्टीने नाही तर केंद्र सरकारच्या दृष्टीने सुध्दा ब्रॉडगेज करणे अत्यंत आवश्यक आहे. तसेच अधिस्विकृतीधारक पत्रकारांना रेल्वे सवलत मिळण्याबाबत नागपूर-भुसावळ-खंडवा ही गाडी सुरु करणे. रेल्वे स्टेशनवरील प्रवाशांना देण्यात येणाऱ्या सोयी-सुविधांमध्ये सुधारणा व वाढ करणे अशा अनेक मागण्यांबाबत खासदार अमर काळे यांनी केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांची आज १० फेब्रुवारीला भेट घेऊन मागण्यांसंबंधी चर्चा केली.

